आर.सी.सी.क्र.१००/२०२१

नि.क्र.४३

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – नरसिंग माधवराव शेलार

वय – ५९ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त पोलिस अधिकारी ,

राहणार– श्रीगोंदा

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.ए. पटेकर यांचेमार्फत</u>**

सन २०१९ ते २०२५ पर्यंत पारनेर पोलिस स्टेशन येथे कार्यरत होतो. दि. २०/१२/२०२० रोजी मी पारनेर पो. हे. कॉ. म्हणून कार्यरत असताना माझ्याकडे गु.र.नं.११७२/२०२० चा तपास बाबत तोंडी आदेश आला. आदेशासोबत मला सी. सी. टी. एन. एस. फिर्याद, मेडिकल यादी प्राप्त झाली. मी कागदपत्राचे अवलोकन केल्यावर फिर्यादीने दाखवलेले घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष २१/१२/२०२० रोजी पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. पंचानाम्यास नि. **४४** देण्यात येत आहे. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. जनार्दन बोरुडे मी नोंदविला होता. जनार्दन बोरुडे यांच्या जबाबातील अधोरेखित भाग अ माझ्यासमोर सांगितला होता. त्यानंतर वैदयकिय अधिकारी यांच्याकडून जखमेचे प्रमाणपत्र हस्तगत केले व त्याकरिता मी दि. ३१/१२/२०२० रोजी त्यांना पत्र पाठविले होते. ते पत्र मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही असून व त्यातील मजकुर बरोबर असून त्यात नि. **४५** देण्यात येते. तपासात आरोपीने जखमीच्या तोंडावर मारहाण केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी आज रोजी न्यायालयात उपस्थित आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे एम.बी. गायकवाड वकील यांचे मार्फत.</u>**

तपासाला जाताना वाहनाची नोंद स्टेशन डायरी ला होती का हे आठवत नाही. पारनेर पासून जाताना विरोली फाटा लागून पुढे विरोली गाव लागते. पारनेर पोलिस स्टेशन पासून घटनास्थळाकडे जाण्यासाठी २५ मिनिटे लागतात व त्यामध्ये १५ किमी अंतर आहे. मी सकाळी ७.३० वाजता निघून घटनास्थळी ८.०० वाजता पोहचलो. हे म्हणणे खरे नाही कि कुठल्याही गुन्हयाचा तपास करताना वरिष्ठांचा लेखी आदेशच लागतो.

प्रश्न – घटनेमध्ये दगडाने तोंडावर मारले असेल तर रक्त कपडयावर सांडले असेल तर ते कपडे तुम्ही जप्त केले होते का?

उत्तर – नाही

हे म्हणणे खरे नाही कि अशी कुठलीच घटना घडलेली नाही व त्यामुळे मी काही जप्त केले नाही. मला पंचांची नावे सांगता येणार नाही ती पाहून सांगावी लागेल. हे म्हणणे खरे नाही कि जिथे घटना घडली तिथे आजूबाजूला अनेक वस्त्या आहेत. हे म्हणणे खरे नाही कि पंच फिर्यादीचे नातेवाईक

होते. घटनास्थळी रक्त सांडल्याचे दिसले नाही कारण माती कुरवाळलेली होती. घटनास्थळाचा गट नं. २६० असेल. घटनास्थळाच्या चर्तुसिमा मला सांगता येणार नाही. कान्हूर पठार येथे डॉ. मुकेश ठुबे यांचे खासगी हॉस्पिटल असल्याचे मला सांगता येणार नाही. मी डॉ. मुकेश ठुबे यांचा जबाब घेतला नाही. घटनास्थळाचे फोटो व व्हीडिओ काढले नाहीत. हे म्हणणे खरे नाही कि मी वरिष्ठांच्या सांगण्यावर खोटे दोषारोप पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही कि मी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(डॉ.एन.एस.सबनीस)

दिनांकः २६/१२/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.